जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २५३ | रविवार, १२ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### स्वारगेट परिसरात खुनाचा प्रयत्न; वर्षभर पोलिसांना गुंगारा देणारा अटकेत

**स्वारगेट, ता. ११ :** स्वारगेट परिसरात एकाचा खुनाचा प्रयत्न करून पसार झालेल्या सराइताला गुन्हे शाखेच्या युनिट दोनने अटक केली. राजसिंग युवराजसिंग जुनी (वय -२८, रा. पाटील इस्टेट, मुंबई-पुणे रस्ता, शिवाजीनगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. गेल्या वर्षी स्वारगेट परिसरात एकावर तीक्ष्ण शस्त्राने वार करून आरोपी जुनी पसार झाला होता. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो गेले वर्षभर पोलिसांना गुंगारा देत होता. पसार झालेला आरोपी एका इमारतीच्या तळमजल्यावर थांबल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट दोनमधील पोलीस कर्मचारी विशाल दळवी आणि आझिम शेख यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्याला गुन्हे शाखेने स्वारगेट पोलिसांच्या ताब्यात दिले.

# पुणे सोलापूर महामार्गावर वाहतूक कोंडीसह अवैध वाहतूक सुसाट

## सामान्यांवर मात्र पोलिसांचा दंडुका; हडपसर-लोणी काळभोर वाहतूक पोलिसांचा दुहेरी न्याय उघड

**लोणी काळभोर, ता. ११ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतूक कोंडीने नागरिकांचे हाल होत असतानाच आता आणखी एक गंभीर वास्तव समोर येत आहे. महामार्गावर अवजड व अवैध प्रवासी वाहतूक खुलेआम सुरू असूनही वाहतूक पोलिसांकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. उलट, वाहतूक नियमनाऐवजी गोरगरीब, कष्टकरी व नोकरदारांच्या वाहनांवरच कारवाई करत पावत्या फाडण्यात पोलिस व्यस्त असल्याचे दिसून येत आहेत.

दरम्यान, रिक्षा चालकांकडून क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरून अक्षरशः मेंढरांसारखी वाहतूक केली जात आहे. टेम्पो, पिकअप, ट्रक यांसारख्या अवजड वाहनांमधूनही नियम धाब्यावर बसवून ओव्हरलोड वाहतूक सुरू आहे. या धोकादायक प्रकारामुळे अपघातांचा धोका वाढत असतानाही संबंधितांवर कठोर



कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

विशेष म्हणजे, काही ठिकाणी रिक्षा व बड्या पुढाऱ्यांच्या गाड्या सर्रास रस्त्यावर उभ्या केल्या जातात. मात्र, अशा वाहनांवर कारवाई करताना पोलिसांचे हात आखडतात का? असा थेट सवाल उपस्थित होत आहे. सामान्यांवरच कारवाई आणि प्रभावशालींना मोकळीक अशी भावना नागरिकांमध्ये वाढत असून त्यामुळे हडपसर व लोणी काळभोर वाहतूक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वाहतूक कोंडी, अवैध प्रवासी वाहतूक आणि पोलिसांचा निवडक कारवाईचा पवित्रा यामुळे महामार्गावरील परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. अपघातांची शक्यता वाढत असतानाही प्रशासन ठोस पावले उचलताना दिसत नाही, ही चिंतेची बाब आहे. आधी वाहतूक सुरळीत करा, अवैध वाहतूक बंद करा आणि त्यानंतरच दंडात्मक कारवाई करा, अशी ठाम मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अन्यथा, या वाढत्या अराजकामुळे नागरिकांचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास ढासळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### आयुक्तसाहेब, पूर्व हवेलीच्या कोंडीवरही सर्जिकल स्ट्राईक करा!

पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील अवैध धंदे आणि गुंडगिरीविरोधात सर्जिकल स्ट्राईक करण्याची घोषणा करत त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे. या निर्णयाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. मात्र, याचबरोबर हवेलीच्या पूर्व भागातील नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या पुणेसोलापूर महामार्गावरील भीषण वाहतूक कोंडीकडेही तितक्याच गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. या कोंडीला काही अंशी वाहतूक पोलिसांच्या निष्क्रियतेचा आणि नातेसंबंधांमुळे होत असलेल्या दुर्लक्षाचाही फटका बसत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे अवैध धंद्यांप्रमाणेच या वाहतूक कोंडीवरही सर्जिकल स्ट्राईक करून ठोस आणि प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी पूर्व हवेलीतील नागरिकांकडून केली जात आहे.

### 'सात'च्या आत सुखरूप घरात, वाहतूक पोलिसांचे नवीन धोरण

लोणी काळभोर व हडपसर वाहतूक पोलिस दलातील ठराविक कर्मचारी आपल्या नेमलेल्या जागेवर त्यांच्या वेळेनुसार हजर राहत असल्याचे दिसुन येते. मात्र, सकाळी नऊ वाजता सेल्फी काढून पाठवला की, अनेक महाभाग आपआपल्या कामासाठी निघून जात असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी वाहतूक नियमन नावालाच उरले असून अनेक पोलिस कर्मचारी सात वाजण्यापूर्वीच नेमलेल्या जागा सोडून जातात. वर्दळीच्या चौकामध्ये रात्री नऊ वाजेपर्यंत वाहतूक पोलिसांची गरज असतानाही पोलिसांनी मात्र 'सात'च्या आत सुखरूप घरात हे धोरण स्वीकारले आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य करणाऱ्या रिक्षाचालकाला २४ तासांत अटक

**पुणे, ता. ११ :** शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य करुन पसार झालेल्या रिक्षाचालकाला हडपसर पोलिसांनी अटक केली. रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर हडपसर पोलिसांनी २४ तासात न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. युनूस गफार खान (वय ५५, रा. कोंढवा) असे अटक करण्यात आलेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. याबाबत एका शाळकरी मुलीने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, खान याच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियम न्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ मार्च रोजी पीडीत ११ वर्षीय शाळकरी मुलगी शाळेतून घरी निघाली होती. त्या वेळी रिक्षाचालक खान याने मुलीशी अश्लील कृत्य केले. घाबरलेल्या मुलीने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर खान पसार झाला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेतला. खान याला अटक करण्यात आल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले. या गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलिसांनी तपास करुन आवश्यक ते पुरावे संकलित करुन त्याच्याविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी २४ तासात आरोपपत्र दाखल केले.

# नात्याचा गैरफायदा घेत एकाकडून दोन अल्पवयीन मुलींवर वारंवार अत्याचार

## आरोपीला २० वर्ष सक्तमजुरीची शिक्षा तर तीस हजार रुपये दंडाची शिक्षा

**लोणी काळभोर, ता. ११ :** नात्याच्या गैरफायदा घेत एका व्यक्तीने दोन अल्पवयीन मुलींवर वारंवार अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली होती. ही घटना उरुळी देवाची (ता. हवेली) परिसरात सन २०२० रोजी घडली होती. या गुन्ह्यातील नराधमाला पुणे जिल्हा व सत्र न्यालयाने २० वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व तीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. हे आदेश न्यायाधीश डि.पी.रागीट यांनी दिले आहेत. सुनील कोंडीबा जेधे (वय ५६ रा. मु. पो. भिवडी ता. पुरंदर जि. पुणे) असे शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी एका ३३ वर्षीय महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,



फिर्यादी महिलेचा आरोपी सुनिल जेधे हा नातेवाईक असल्याने त्यांच्या घरी वारंवार ये-जा करत होता. या ओळखीचा फायदा घेत त्याने फिर्यादीच्या १४ आणि १३ वर्षांच्या दोन मुलींना विविध कारणे सांगून बाहेर नेले आणि उरुळी देवाची परिसरातील लॉजमध्ये नेऊन त्यांच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला आहे.

आरोपी सुनील जेधे याने या घटनेची कोठेही वाक्यता केल्यास आई-वडिलांना मारून टाकण्याची धमकी दिली होती. या भीतीपोटी दोन्ही मुली गप्प राहिल्या. मात्र, मुलींच्या वर्तनात बदल दिसून आल्याने कुटुंबीयांनी चौकशी केली असता हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार आरोपीच्या विरोधात भारतीय दंड संहिता कलम ३७६,(२)(f), ३७६ (२) (n), ५०६, पोक्सो ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच, लोणी काळभोर पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.


सदर गुन्ह्याचा खटला हा पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात सुरु होता. या खटल्यात सरकारी वकील अरूंधती ब्रम्हे यांनी केलेले युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला सी. आर. पी. सी. २३५(२) प्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ३७६ (२) (f) , ३७६ (३) व , पोक्सो ४, ५, ६ खाली २० वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व तीस हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक वर्ष सक्तमजुरी व भारतीय दंड संहिता कलम ५०६ अन्वये एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आहे.

दरम्यान, या खटल्यात सरकारी वकील अरूंधती ब्रम्हे यांना लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, तापसी अधिकारी व्हि.पी.झिंजुक, सहाय्यक फौजदार विनोद कांबळे, पोलीस हवालदार अश्विनी पवारव पोलीस अंमलदार अशोक शिंदे यांची बहुमुल्य मदत मिळाली.

# भोसरी येथील मोक्का गुन्ह्यातील टोळी प्रमुख पिल्या राक्षेला जामीन मंजूर

**भोसरी, ता. ११ :** भोसरीचा भाई असल्याचा धाक दाखवत अंडा बुर्जीच्या दुकानावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना १३ जुलै २०२३ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली होती. या प्रकरणातील आरोपींवर पोलीस प्रशासनाकडून मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणातील टोळी प्रमुखाला ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर विशेष मोक्का व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश किशोर शिंदे यांनी जामीन मंजूर केला आहे, अशी माहिती ॲड. विपुल दुशिंग व ॲड. सर्वेश निकम यांनी दिली.

सुदर्शन उर्फ पिल्या राक्षे असे जामीन मंजूर करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी मेघराज मंटाळे (वय ३२) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चौफुला चौकातील अंडा बुर्जीच्या दुकानात करण राठोड, पत्या उर्फ प्रथमेश कांबळे आणि त्यांच्या साथीदारांनी धुडगूस घातला. अंडा बुर्जी त्वरित द्या अशी मागणी करत त्यांनी कामगार परवीन इनामदार यांच्याशी वाद घातला आणि लगेचच मारहाण सुरू केली.

परिस्थिती चिघळताच आरोपींनी दुकानातील लोखंडी तवा, रॉड आणि लाकडी बॅटचा वापर करून मेघराज मंटाळे व त्यांच्या कामगारांवर बेछूट हल्ला केला. या हल्ल्यात दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना पिंपरी येथील वायसीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, आरोपींनी कामगार हुसेन इनामदार यांच्या खिशातील सुमारे ८ हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून घेतले. तसेच दुकानातील साहित्याची तोडफोड करत मोठे नुकसान केले. इथे धंदा करायचा असेल तर आम्हाला पाहिजे ते लगेच द्यावे लागेल, नाहीतर जीव घेऊ, अशी उघड धमकी देत आरोपींनी परिसरात दहशत निर्माण केली. या घटनेदरम्यान आरोपींपैकी एकाने मी भोसरीचा भाई आहे असे म्हणत लोखंडी रॉड फिरवत उपस्थितांना धमकावले, त्यामुळे नागरिक सैरावैरा पळू लागले. या प्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात करण राठोड, पत्या उर्फ प्रथमेश कांबळे, पिल्या राक्षे आणि अन्य एका साथीदाराविरोधात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींना अटक करण्यात आली होती. या गुन्ह्यातील आरोपींवर पोलीस प्रशासनाच्या वतीने मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली. या खटल्यात आरोपी सुदर्शन उर्फ पिल्या राक्षे याने ॲड. विपुल दुशिंग व ॲड. सर्वेश निकम यांच्या मार्फत विशेष मोक्का व सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या खटल्यात आरोपींविरोधात ठोस पुरावा नसल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाने मांडला. हा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपी पिल्या राक्षे याला ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे.

# ब्लॅक बॉक्सचं काय झालं? अजित पवारांच्या अपघाताप्रकरणी सुप्रिया सुळे यांचा सवाल

बारामती, ता. ११ : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्र सरकारवर गंभीर प्रश्न उपस्थित करत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाची सखोल आणि पारदर्शक चौकशी करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात योग्य वेळी एफआयआर नोंदवला गेला नाही, तसेच चौकशी प्रक्रियेत विलंब होत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.



पुण्यात सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा सुळे म्हणाल्या की, महाराष्ट्र सरकारमध्ये अजित पवार हे महत्त्वाचा घटक होते. मात्र, त्यांच्या अपघातानंतर न्याय मिळवण्यासाठी प्रयत्न करताना अनेक अडचणी येत आहेत. त्यांनी रोहित पवार यांनी या प्रकरणात सातत्याने मुद्दे मांडल्याचे नमूद करत, त्यांच्या मागण्यांकडे गांभीयनि पाहण्याचे आवाहन केले.

काँग्रेस पक्ष आणि कर्नाटक सरकारने या प्रकरणात पुढाकार घेत एफआयआर नोंदवण्यास सुरुवात केल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. ज्या महाराष्ट्र सरकारने न्याय द्यायला हवा होता, त्या ठिकाणी उशीर होत असताना काँग्रेसने पुढाकार घेतला, असे त्या म्हणाल्या. तसेच, या अपघाताच्या चौकशीबाबत अद्याप कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नसल्याबद्दलही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. चौकशी समिती स्थापन झाली का, तिचे अध्यक्ष कोण आहेत, आणि आतापर्यंत काय निष्कर्ष निघाले, याबाबत सरकारने माहिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

# स्वामी विवेकानंद अकॅडमीच्या १८ विद्यार्थ्यांना मानाचा स्काऊट गाईड राज्य पुरस्कार जाहीर

**उरुळी कांचन, ता. ११ :** येथील स्वामी विवेकानंद अकॅडमीच्या स्काऊट गाईड पथकाने राज्यस्तरावर चमकदार कामगिरी केली आहे. भारत स्काऊट गाईड राज्य कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या अत्यंत कठीण अशा राज्य पुरस्कार चाचणी शिबिरात विद्यालयाचे १८ विद्यार्थी यशस्वी झाले असून, त्यांना राज्य पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.



भारत स्काऊट गाईड राज्य कार्यालयामार्फत दरवर्षी या चाचणी शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी झालेल्या विविध सत्रांमधील निकालात स्वामी विवेकानंद अकॅडमीच्या दुसऱ्या बॅचच्या सर्व विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. स्काऊट गाईड विभागात १२ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत झालेल्या चाचणीत आशिष रणदिवे, यशराज थोरात, विश्व जवळकर, यश कापणे, सिद्धांत शिंगे आणि उत्कर्ष किर्वे या ६ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

गाईड विभागात १६ ते १९ जानेवारी २०२६ दरम्यान झालेल्या परीक्षेत स्वराली फडतरे, संस्कृती म्हेत्रे, स्वरा वलटे, अंतरा बगाडे, अक्षरा कदम, सिद्धी ढवळे, सिद्धी ठुले, सिद्धी शिवरकर, कार्तिकी काकडे, समृद्धी त्र्यंबके, कार्तिकी कामठे आणि स्वरांजली गुंजाळ अशा १२ विद्यार्थिनींनी बाजी मारली.

या राज्य पुरस्कार परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना स्काऊट शिक्षक नागेश काळभोर तसेच गाईड शिक्षिका दिपाली शिर्के व सुवर्णा कानडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यालयाची ही दुसरीच बॅच असून, शंभर टक्के विद्यार्थ्यांनी राज्य पुरस्कार मिळवण्याची परंपरा कायम राखली आहे. या ऐतिहासिक यशानंतर स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे ट्रस्टी मेंबर, प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले. दरम्यान, या विद्यार्थ्यांची आता पुढील ध्येय असणाऱ्या सर्वोच्च 'राष्ट्रपती पुरस्कार' परीक्षेसाठी तयारी सुरू झाली असून, त्यासाठी त्यांना मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. या यशाबद्दल पालकांनीही समाधान व्यक्त केले असून विद्यालयाच्या शिस्तबद्ध मार्गदर्शनाचे कौतुक होत आहे.

## संक्षिप्त

### हडपसर येथील सुरक्षारक्षकाची गळफास घेऊन आत्महत्या

**पुणे, ता. ११:** हडपसर परिसरातील ग्लायडिंग सेंटरच्या आवारात २९ वर्षीय सुरक्षारक्षकाचा मृतदेह शुक्रवारी सकाळी आढळला. ज्ञानेश्वर शिवाजी गाडेकर (वय २९) असे मृत व्यक्तीचे नाव असून त्यांनी झाडाला गळफास घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली. ज्ञानेश्वर गाडेकर हे मूळ लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथील रहिवासी होते आणि सध्या फुरसुंगी येथील पापडे वस्तीमध्ये राहत होते. ते हडपसरमधील एका कंपनीत सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. गुरुवारी ते नेहमीप्रमाणे घरातून डबा घेऊन कामावर जाण्यासाठी निघाले होते. मात्र, ते कंपनीत पोहोचले नाहीत आणि रात्रीपर्यंत घरी परतले नाहीत. शुक्रवारी सकाळी हडपसर ग्लायडिंग सेंटरच्या मोकळ्या परिसरात एका व्यक्तीने झाडाला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. माहिती मिळताच काळेपडळ पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृताच्या खिशात सापडलेल्या कागदपत्रांवरून त्यांची ओळख पटली. त्यानंतर पोलिसांनी कुटुंबीयांशी संपर्क साधला. या प्रकरणात कोणतीही सुसाईड नोट आढळलेली नाही. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

### झेड ब्रिज दुरुस्तीच्या कामासाठी महिनाभर बंद राहणार

**पुणे, ता. ११ :** शहरातील डेक्कन आणि पेठ भागांना जोडणारा स्वर्गीय काकासाहेब गाडगीळ पूल, म्हणजेच झेड ब्रिज, दुरुस्तीच्या कामासाठी महिनाभर अंशतः बंद राहणार आहे. झचउने स्ट्रक्चरल ऑडिटनंतर हा निर्णय घेतला आहे. १० एप्रिल ते ९ मे २०२६ या कालावधीत पुलावर रात्रीच्या वेळी वाहतुकीवर पूर्ण बंदी असणार आहे. दररोज रात्री ११ वाजेपासून सकाळी ७ वाजेपर्यंत पुलावरील वाहतूक थांबवण्यात येईल. दिवसाच्या वेळेत मात्र वाहतूक सुरू राहणार आहे. या कालावधीत पुलाचे एक्सपेंशन जॉइंट्स आणि बेअरिंग्ज बदलण्याचे महत्त्वाचे तांत्रिक काम केले जाणार आहे. पुलाची सुरक्षितता वाढवण्यासाठी आणि तो दीर्घकाळ टिकण्यासाठी ही दुरुस्ती आवश्यक असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या आदेशानुसार शहरातील धोकादायक पुलांचे ऑडिट करण्यात आले होते. त्यामध्ये १७ पुलांची यादी करण्यात आली होती. त्यापैकी खडकवासला आणि संभाजी पूल दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून आता झेड ब्रिजच्या कामाला सुरुवात होत आहे. दरम्यान, रात्रीच्या वेळी वाहतूक बंद असल्याने नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सुनेत्रा पवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निधीची मागणी

**पुणे, ता. ११ :** ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळेच्या रुपाने महात्मा फुले यांच्या गावात पवित्र ज्ञान मंदिर उभे राहणे अभिमानास्पद आहे. शाळेसह या ठिकाणी संशोधन केंद्र, क्रीडा सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या अधिकच्या निधीला मुख्यमंत्र्यांनी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी उपमुख्यंत्री सुनेत्रा पवार यांनी केली.

खानवडी येथे पुणे जिल्हा परिषदेने उभारलेल्या ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी पवार बोलत होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, खासदार सुप्रिया सुळे आदी या वेळी उपस्थित होते.

अजित पवार यांच्या हस्ते शाळेचे भूमीपूजन झाले होते अशी आठवण सांगून सुनेत्रा पवार म्हणाल्या, खानवडी येथे उभारण्यात आलेली शाळा फुले यांच्या विचारांचे स्मारक ठरेल. अत्याधुनिक सुविधांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठी संधी मिळणार आहे. या शाळेतून संवेदनशील आणि समाजासाठी योगदान देणारे विद्यार्थी घडतील. तसेच जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील १ हजार शाळा मॉडिल शाळा म्हणून विकसित करण्यात येत आहेत. आतापर्यंत



तीनशेहून अधिक शाळांचे काम सुरू झाले आहे, तर पुढील वर्षी सहाशेपेक्षा जास्त शाळांचे काम सुरू करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद, ग्रामस्थांच्या सहकार्यातून हा प्रकल्प साकारत आहे.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या गावात उभारलेल्या अत्याधुनिक शाळेचे उद्घाटन ही द्विशताब्दी वर्षाची सर्वात योग्य सुरुवात आहे. सीबीएसईशी संलग्न असलेली ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून या शाळेची उभारणी झाली असून त्यांनी शाळा उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष घातले.

स्त्री शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत महात्मा फुले यांनी भिडे वाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. फुले यांनी तत्कालीन हंटर कमिशनकडे मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची मागणी केली होती. आजचा शिक्षणाचा अधिकार कायदा ही त्याच विचारांची फलश्रुती आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत राज्य शासन महात्मा फुले जनआरोग्य योजना राबवत असून त्याअंतर्गत नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार दिले जात आहेत. महात्मा फुले यांच्या नावाने राज्यभरात एक हजार कौशल्य प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. महाज्योतीच्या माध्यमातून ओबीसी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

### मुंबईत बाळाच्या मृत्यू प्रकरणावरून खळबळ

**मुंबई, ता. ११ :** वाडिया रुग्णालयात उपचारादरम्यान एका बाळाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या प्रकरणात पालकांनी रुग्णालय प्रशासनावर गंभीर निष्काळजीपणाचे आरोप केले आहेत. दरम्यान, मृत बाळाला कपड्यात गुंडाळून एक महिला रुग्णालयाबाहेर जात असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ही घटना चर्चेत आली. या व्हिडिओमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणावर रुग्णालय प्रशासनाने आपली भूमिका स्पष्ट करत, अद्याप कोणतीही औपचारिक तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे सांगितले आहे. तसेच सोशल मीडियावर फिरणारे आरोप दिशाभूल करणारे असून, संस्थेची प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने ते पसरवले जात असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

# ‘आनंद राठी वेल्थ’च्या कार्यकारी संचालकासह ५ जणांवर विनयभंगाचा गुन्हा

## शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**पुणे, ता. ११ :** आनंद राठी वेल्थ कंपनीतील कार्यकारी संचालकासह ५ जणांविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३३ वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदवण्यात आला असून हा प्रकार मे २०२४ ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान पुण्यात घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. मुंबईतील एन. एम. जोशी मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर हा गुन्हा शिवाजीनगर पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.




या प्रकरणात कार्यकारी संचालक स्वपन चक्रवर्ती, सीईओ राकेश रावल, जॉईंट सीईओ फिरोजी अजीज, एचआर प्रमुख तेजल शाह आणि कार्यकारी संचालक सोनाली रावल यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला कंपनीत काम करत असताना स्वपन चक्रवर्ती यांनी वेळोवेळी तिच्याशी अयोग्य वर्तन करून विनयभंग केल्याचा आरोप आहे.

तक्रारीनुसार, संबंधित अधिकाऱ्याने महिलेला तक्रार न करण्यासाठी करिअर संपवण्याची धमकी दिली आणि तिचा पाठलाग केल्याचे नमूद आहे. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ झाल्यानंतर महिलेने कंपनीच्या वरिष्ठांकडे तक्रार केली होती. मात्र, तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच, या प्रकरणाची माहिती देऊनही संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. उलट फिर्यादी महिलेची दुबई येथे बदली करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

### इंदापुरातील सोसायटीच्या लाचखोर सचिवाला रंगेहाथ पकडले

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. ११ : पीककर्ज मंजुरीसाठी शेतकऱ्याकडून लाचेची मागणी करणाऱ्या इंदापूर तालुक्यातील पंधरवाडी येथील जय भवानी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या सचिवाला अ‍ॅन्टी करप्शन ब्युरोच्या पथकाने रंगेहाथ पकडत मोठी कारवाई केली. याप्रकरणी नाना चंद्रकांत बोराटे (वय-४३) याच्याविरुद्ध इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार (वय ३४) हे शेतकरी असून त्यांनी गट नं. १७३/२ वरील जुने पीक कर्ज फेडल्यानंतर नवीन कर्ज मिळविण्यासाठी जय भवानी सोसायटीमार्फत प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावावर कार्यवाही करण्यासाठी आरोपी सचिव नाना बोराटे यांनी सुरुवातीला २ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार ८ एप्रिल रोजी एसीबीकडे दाखल झाली, तक्रारीनंतर एसीबीने तात्काळ पडताळणी कारवाई केली, ८ एप्रिल रोजी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या इंदापूर शाखेत झालेल्या पडताळणीत नाना बोराटे यांनी १ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर ९ एप्रिल रोजी सापळा रचण्यात आला. पंधरवाडी येथील सोसायटीच्या आवारात आरोपीने तक्रारदाराकडून १ हजार रुपयांची लाच स्वीकारताच दुपारी सव्वा बारा वाजता एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ जेरबंद केले. ही कारवाई पोलीस निरीक्षक अविनाश धरबुडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून तपास पोलीस निरिक्षक शैलजा शिंदे करीत आहेत.




### देऊळगाव गाडा येथे लग्नकार्यात स्टेजवरून खाली उतरण्यावरून वाद

#### वृद्ध महिलेला मारहाण; तिघांविरुद्ध यवत पोलिसांत गुन्हा

**यवत, ता. ११ :** लग्नामध्ये स्टेजवरून खाली उतरण्याच्या वादातून एका ६५ वर्षीय महिलेला लाकडी काठीने बेदम मारहाण करण्यात आली आहे. याप्रकरणी यवत पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. देऊळगाव गाडा (ता. दौंड) येथे रविवारी (ता. ०५) सकाळी लग्नात साखरपुड्याचा कार्यक्रम सुरू असताना हि घटना घडली.

नवनाथ साहेबराव मोरे, शुभ नवनाथ मोरे, साहेबराव पांडुरंग मोरे (सर्व रा. देऊळगाव गाडा, ता. दौंड) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी लिता दिगंबर मोरे (वय-६५, रा. नारायण बेट, देऊळगाव गाडा, ता. दौंड) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ललिता मोरे रविवारी सकाळी आपल्या मुलासह (सोमनाथ) पुतण्याच्या मुलीच्या लग्नासाठी गेल्या होत्या. लग्नात साखरपुड्याचा कार्यक्रम सुरू असताना नवनाथ मोरे याने सोमनाथला स्टेजवरून खाली उतरण्यास सांगितले. यावेळी ललिता मोरे यांनी मध्यस्थी करत गेल्या वर्षी आंबेडकर जयंतीलाही तू माझ्या मुलाला शिव्या दिल्या होत्या, आता पुन्हा का शिव्या देतोस? असा जाब विचारला. याचा राग धरून वादाला सुरुवात झाली.

ललिता मोरे यांनी जाब विचारताच नवनाथ मोरे यांचा मुलगा शुभ मोरे याने तुमचे काय कारण आहे मला बोलण्याचे? असे म्हणत त्यांना हाताने धक्काबुक्की केली. इतकेच नव्हे तर शुभ याने आपल्या हातातील लाकडी काठीने ललिता मोरे यांच्या पाठीवर जोरात प्रहार केला. यावेळी साहेबराव पांडुरंग मोरे यानेही अश्लील शिवीगाळ करत दमदाटी केली. अखेर नातेवाईकांनी मध्यस्थी करून हे भांडण सोडवले. ललिता मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून यवत पोलीस ठाणे (अंकित पाटस चौकी) येथे भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार मड्डी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### भाजप नेत्या अडचणीत?; ’उभा चिरून टाकण्याची धमकी, ऑडिओ क्लिप व्हायरल

**पुणे, ता. ११ :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात भाजपच्या पदाधिकारी आशा बुचके यांच्यावर एका युवकाला पैशासाठी धमकावल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणातील ऑडिओ क्लिप समोर आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.




रोशन बिरमल यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गेस्ट हाऊसमध्ये बोलावण्यात आले होते. तेथे आशा बुचके यांनी पैशासाठी दबाव टाकल्याचा आरोप आहे. पैसे न दिल्यास उभा चिरून टाकीन, जीभ कापून टाकेन अशा धमक्या दिल्याचेही त्यांनी सांगितले आहे. या प्रकरणातील ऑडिओ क्लिपमध्ये धमकीची भाषा स्पष्ट ऐकू येत असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी की वसुली करणारी टोळी? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

रोशन बिरमल यांनी सांगितले की, त्यांच्याकडून जबरदस्तीने चेक घेण्यात आला. पैसे न दिल्यास जीवाला धोका असल्याची धमकी देण्यात आली. या संदर्भात त्यांनी जुन्नर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

दरम्यान, आशा बुचके या याआधीही वादात सापडल्या आहेत. त्या पूर्वी शिवसेनेत सक्रिय होत्या आणि नंतर भाजपमध्ये दाखल झाल्या. शिवनेरीवरील एका कार्यक्रमात त्यांनी आमदाराच्या हातातील माईक हिसकावून घेतल्याचा प्रकारही चर्चेत आला होता. या नव्या आरोपांमुळे त्या पुन्हा एकदा वादाच्या केंद्रस्थानी आल्या असून पुढील तपासात काय निष्पन्न होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### स्टिंग ऑपरेशनच्या नावाखाली चित्रीकरण; पुण्यात पत्रकारावर गुन्हा

**पुणे, ता. ११ :** पुणे शहरातील बुधवार पेठ परिसरात एका लॉजमध्ये महिलेचे बेकायदेशीरपणे चित्रीकरण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्टिंग ऑपरेशनच्या नावाखाली एका पत्रकाराने हे कृत्य केल्याचा आरोप असून, या प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहन कदम असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव असून पीडित महिलेने या संदर्भात रीतसर फिर्याद दिली आहे. ही घटना ३ दिवसांपूर्वी मध्यरात्री घडली असून, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केल्यानंतर कारवाईचे आदेश दिले आहेत.

तपासादरम्यान असे स्पष्ट झाले की, स्टिंग ऑपरेशनचे कारण पुढे करून संबंधित पत्रकाराने महिलेचे चित्रीकरण केले होते. या प्रकरणाची माहिती मिळताच पुणे श्रमिक पत्रकार संघाने तीव्र संताप व्यक्त केला आहे. पत्रकार संघाने या घटनेचा जाहीर निषेध केला असून पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना या संदर्भात एक निवेदनही दिले आहे. बुधवार पेठेतील एका लॉजमध्ये घडलेला हा विनयभंगाचा प्रकार अतिशय घृणास्पद असून, यामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पत्रकारांची समाजात बदनामी होत असल्याची भावना पत्रकार संघाने व्यक्त केली आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल होऊ नये यासाठी काही लोकांकडून दबाव आणला जात असल्याची चर्चा शहरात सुरू होती. मात्र, पुणे श्रमिक पत्रकार संघाने आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, अशा चुकीच्या कामात संघ कोणाचेही समर्थन करणार नाही. पत्रकार संघाने पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले यांची भेट घेऊन, आरोपीवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता कठोर पावले उचलण्याची मागणी करण्यात आली आहे.

पुण्यातील पत्रकारांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षेसाठी पत्रकार संघ नेहमीच तत्पर राहिला आहे. परंतु, अशा प्रवृत्तींमुळे संपूर्ण पत्रकारितेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. त्यामुळे आरोपी आणि त्याला मदत करणाऱ्या सहकाऱ्यांना कोणताही पाठिंबा दिला जाणार नाही, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या विश्रामबाग पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांची पडताळणी केली जात आहे.

### लिंगाळीत बँक अधिकारी आणि शेतकऱ्यामध्ये फ्री-स्टाईल हाणामारी

#### दौंड पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल

**दौंड, ता. ११ :** लिंगाळी ग्रामपंचायतीसमोर भररस्त्यात बँक अधिकारी आणि कर्जदार शेतकरी यांच्यात हाणामारी झाली असून, दोन्ही पक्षांनी एकमेकांच्या डोक्यात दगड मारून जखमी केल्याचा दावा केला आहे. याप्रकरणी दोन्ही बाजूकडून दौंड पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत फिर्यादी भिमराव विठोबा पांढरे (वय ४२, रा. मलठण) यांनी आरोप केला आहे की, त्यांनी शेती कर्जासाठी बँकेत अर्ज केला होता. बँकेचे अधिकारी अक्षय आटोळे यांनी एक महत्त्वाचा कागद गहाळ केल्याने त्यांनी वरिष्ठांकडे तक्रार केली होती. याचाच राग मनात धरून ८ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता लिंगाळी येथे आटोळे यांनी आपली चारचाकी गाडी भिमराव




यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर रस्त्यावरील दगडाने त्यांच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली.

दुसऱ्या घटनेत बँक अधिकारी अक्षय पांडुरंग आटोळे (वय-३०, रा. रावणगाव) यांनीही फिर्याद दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, भिमराव पांढरे यांच्या कर्जाच्या कागदपत्रात त्रुटी होत्या, त्याबाबत पत्राद्वारे कळवल्याचा राग पांढरे यांना होता. ८ एप्रिल रोजी त्रुटींचे पत्र घेऊन जाण्यासाठी फोन केला असता पांढरे यांनी शिवीगाळ केली. त्यानंतर लिंगाळी येथे रस्ता अडवून भिमराव पांढरे यांनी अक्षय यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि दगडाने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत केली.

दरम्यान, दोन्ही फिर्यादींच्या तक्रारीवरून दौंड पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या खालील कलमान्वये गुन्हे दाखल केले असून या प्रकरणाचा पुढील तपास दौंड पोलीस करत आहेत.

# किंग कोहलीकडून वैभव सूर्यवंशीचे कौतुक; सामन्यानंतर दिलं खास गिफ्ट

**गुवाहाटी, ता. ११ :** आयपीएल २०२६ च्या हंगामात गुरुवारी गुवाहाटीच्या मैदानावर केवळ धावांचा पाऊस पडला नाही, तर क्रिकेट विश्वाला सुवर्णक्षण पाहायला मिळाला. राजस्थान रॉयल्सचा १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याच्या स्फोटक खेळीने आरसीबीचा पराभव तर केलाच, पण खुद्द विराट कोहलीलाही त्याचे कौतुक करण्यापासून रोखता आले नाही.




आरसीबीविरुद्ध झालेल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने आपल्या बॅटने गुवाहाटीत वादळ निर्माण केले. २०२ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना वैभवने अवघ्या २६ चेंडूंत ७८ धावांची वादळी खेळी केली, ज्यामध्ये ८ चौकार आणि ७ गगनचुंबी षटकारांचा समावेश होता. या विजयानंतर मैदानात एक भावूक क्षण पाहायला मिळाला, जेव्हा विराट कोहलीने वैभवच्या टोपीवर ऑटोग्राफ दिला आणि त्यावर डियर वैभव, वेल डन असा संदेश लिहिला. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वाऱ्यासारखा व्हायरल होत आहे.

वैभव सूर्यवंशीने या हंगामात आतापर्यंत केवळ ४ सामने खेळले असून त्याने २०० धावांचा टप्पा ओलांडला आहे. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याने आयपीएल २०२६ ची ऑरेंज कॅप आपल्या नावावर केली आहे. इतक्या लहान वयात जगातील सर्वोत्तम गोलंदाजांना धूळ चारणारा वैभव यंदाच्या हंगामातील सर्वात मोठा स्टार ठरला आहे. त्याला या सामन्यात ध्रुव जुरेलची (८१) मोलाची साथ लाभली.


#### ड्रेसिंग रूमचा लाडका खेळाडू

राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागने विजयानंतर वैभवचे भरभरून कौतुक केले. पराग म्हणाला, वैभव केवळ मैदानातच नाही, तर ड्रेसिंग रूममध्येही सर्वांचा लाडका आहे. तो खेळाचा आनंद घेईल आणि निडरपणे खेळेल याची आम्ही काळजी घेतो. वैभवने २०२५ मध्ये आयपीएल पदार्पण केले होते आणि अवघ्या एका वर्षात त्याने भारतीय क्रिकेटचे भविष्य म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. राजस्थानने आता सलग ४ सामने जिंकून गुणतालिकेत अव्वल स्थान भक्कम केले आहे.

# महाराष्ट्रात रिक्षा चालवायची असेल तर मराठी आलंच पाहिजे

## १ मेपासून नवा नियम लागू; नियम मोडल्यास थेट परवाना रद्द!

**पुणे, ता. ११ :** महाराष्ट्रात रिक्षा चालवण्यासाठी मराठी भाषा येणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईल यांनी याबाबत माहिती दिली असून १ मे २०२६ पासून हा नियम राज्यभर लागू होणार आहे. या नियमाचे पालन न करणाऱ्या रिक्षाचालकांवर थेट परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाणार आहे.



याआधी हा निर्णय फक्त मीरा-भाईंदर परिसरापुरता मर्यादित असल्याची चर्चा होती. मात्र आता हा नियम संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व रिक्षाचालकांसाठी लागू करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परिवहन विभागाकडून १ मेपर्यंत राज्यभर तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. या कालावधीत रिक्षाचालकांना मराठी भाषेचे ज्ञान आहे का, याची पडताळणी केली जाईल. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, राज्यात बेकायदेशीर बाईक टॅक्सी सेवांवरही कारवाई करण्यात आली आहे. ओला, उबर आणि रॅपिडो यांसारख्या कंपन्यांच्या बाईक टॅक्सी सेवांवर तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि उपनगरांमध्ये मराठी आणि अमराठी भाषेच्या मुद्द्यावरून वाद वाढत होते. या पार्श्वभूमीवर रिक्षाचालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मानले जात आहे. या निर्णयामुळे राज्यातील रिक्षाचालकांमध्ये खळबळ उडाली असून, १ मेनंतर नियमांचे काटेकोर पालन करावे लागणार आहे.

# एमआयटी एडीटीबेंटली सिस्टिम्सचा करार; पुण्यात इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटरची दमदार सुरुवात

**पुणे, ता. ११ :** एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एमआयटी एडीटी) आणि जागतिक स्तरावरील इन्फ्रास्ट्रक्चर अभियांत्रिकी सॉफ्टवेअर क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी बेंटली सिस्टिम्स यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याचवेळी इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटर ऑफ एक्सलन्स या उत्कृष्टता केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षणाला चालना देणे आणि उद्योग-संलग्न शिक्षण अधिक सक्षम करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड सायन्सेस अंतर्गत सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या पुढाकारातून आयोजित या




कार्यक्रमास बेंटली सिस्टिम्सचे दक्षिण आशिया विभागीय कार्यकारी कमलकन्नन तिरुवडी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक संचालक हर्ष नागपाल, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक मोनिका जेधे आणि परमर्थ सैनी हे मान्यवर उपस्थित होते. एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून कार्याध्यक्ष व प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. युवराज भिरूड आदी उपस्थित होते.

या प्रसंगी इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटर ऑफ एक्सलन्स तसेच बेंटली स्टुडंट क्लबचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, स्मार्ट कन्स्ट्रक्शन तंत्रज्ञान आणि शाश्वत अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रगत शिक्षण व संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांना ६५ हून अधिक उद्योगमान्य सॉफ्टवेअर, जागतिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि विशेष तांत्रिक प्रशिक्षण सुविधांचा लाभ मिळणार आहे.


प्रमुख पाहुणे कमलकन्नन तिरुवडी यांनी आपल्या भाषणात स्मार्ट शहरीकरणासाठी सॉफ्टवेअर-आधारित बुद्धिमान पायाभूत सुविधांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. यावेळी एमआयटीचे कार्याध्यक्ष व प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड यांनी हा उपक्रम विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील डिजिटल अभियांत्रिकी कौशल्ये प्रदान करणारा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे सांगितले.

# चालकाने पैसे न दिल्याने महामार्ग पोलिसांनी चक्क ट्रक जाळला

## पंजाबमधील ट्रक मालकाच्या आरोपांनी खळबळ

**नाशिक, ता. ११ :** नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यात पिंपळगाव जलाल टोल नाक्यावर एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महामार्ग पोलिसांनी ट्रक चालकाकडून पैसे मागितले आणि पैसे न दिल्याने ट्रक जाळल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगाव जलाल टोल नाक्यावर महामार्ग पोलिसांनी एक मालवाहू ट्रक अडवला. या वेळी पोलिसांनी चालकाकडे तीस हजार रुपयांच्या दंडाची मागणी केली. तसेच, दंड नको भरू, आम्हाला ५ हजार रुपये दे, अशीही मागणी केल्याचा आरोप ट्रक चालकाने केला आहे.



मात्र चालकाने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर पोलिसांसोबत त्याचा वाद झाला. या वादानंतर पोलिसांनी चालकाला मारहाण केली आणि त्याचा ट्रक पेटवून दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

ट्रक चालकाने दिलेल्या माहितीनुसार, तो पुण्याहून पंजाबमधील भटिंडा येथे जात होता. ट्रकमध्ये आर्मीचे साहित्य असल्याचेही त्याने सांगितले. पोलिसांनी नो-एंट्रीचे कारण देत दंडाची मागणी केली होती. पैसे देण्यास नकार दिल्यावर एका पोलिसाने त्याला मारहाण केली. त्याच वेळी एका पोलिसाच्या हातातील सिगारेटमुळे ट्रकला आग लागल्याचा दावा चालकाने केला आहे.

दरम्यान, आग लागल्यानंतर येवला येथील अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आग विझवली. मात्र तोपर्यंत ट्रकमधील मोठ्या प्रमाणात माल जळून खाक झाला होता. ट्रक चालकाने या घटनेचा व्हिडिओ असल्याचा दावा करत महामार्गावर पोलिसांकडून ट्रक चालकांकडून पैसे उकळले जात असल्याचाही आरोप केला आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू असून सत्य काय आहे, हे तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

# पश्चिम बंगालमधील महिलांना दरमहा ३००० रुपये भत्ता आणि नोकऱ्यांत ३३% आरक्षणाचं भाजपाचे आश्वासन

**पश्चिम बंगाल, ता. ११ :** भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपला जाहीरनामा विश्वासपत्र जाहीर केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. राज्यात २३ आणि २९ एप्रिल रोजी २ टप्प्यांत मतदान होणार असून ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.



Image credit: x.com/@BJP4India

जाहीरनाम्यात महिलांसाठी दरमहा ३००० भत्ता, बेरोजगार तरुणांसाठी ३००० आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. पहिल्या ६ महिन्यांत समान नागरी संहिता लागू करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ४५ दिवसांच्या आत सातवी वेतनश्रेणी लागू करण्याचेही सांगण्यात आले आहे. महिलांसाठी नोकऱ्यांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याची घोषणा करण्यात आली आहे. प्रत्येक विभागात महिला पोलीस ठाणे आणि महिला कक्ष स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. गर्भवती महिलांना २१००० आर्थिक मदत आणि ६ पोषण संच देण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे. राज्य परिवहन बसमध्ये महिलांना मोफत प्रवासाची सुविधा देण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे.

शेती क्षेत्रासाठी धान खरेदी ३१०० प्रति क्विंटल दराने करण्याची घोषणा करण्यात आली आहे. शेतमालाला योग्य दर मिळावा यासाठी स्वतंत्र योजना राबवण्याचे सांगितले आहे. उद्योग क्षेत्रासाठी ४ नवीन औद्योगिक वसाहती उभारण्याचा प्रस्ताव आहे. हल्दिया बंदराच्या विकासावरही भर देण्यात आला आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा उल्लेख आहे. राज्यातील अतिक्रमणे २०० दिवसांच्या आत हटवण्याचा कार्यक्रम राबवला जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्थेवर श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच, पहिल्या १०० दिवसांत विकास आराखडा सादर करण्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील तेंतुलिया येथे प्रचारसभा घेतली. त्यांनी भाजपवर टीका करत राज्याबाहेरील लोकांना निवडणुकीसाठी आणल्याचा आरोप केला. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही प्रमुख पक्षांकडून प्रचार मोहीम आणि जाहीरनाम्यांच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## सतत थकवा आणि चक्कर येतेय? असू शकते लोहाची कमतरता

पुणे, ता. ११ : बिघडलेली जीवनशैली आणि आहारातील बदलांमुळे सध्या अनेकांमध्ये रक्ताल्पता म्हणजेच रक्तातील लोहाची कमतरता जाणवत आहे. थकवा येणे, चक्कर येणे आणि त्वचा निस्तेज होणे ही याची प्राथमिक लक्षणे आहेत. जर तुमच्या शरीरात लोहाची कमतरता असेल, तर औषधांसोबतच आहारात काही नैसर्गिक गोष्टींचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. लोहाची कमतरता भरून काढण्यासाठी खालील पदार्थांचे सेवन फायदेशीर ठरते..

पालेभाज्या (विशेषतः पालक) : पालक हा लोहाचा सर्वात मोठा स्त्रोत मानला जातो. पालकामध्ये केवळ लोहच नाही, तर व्हिटॅमिन सी देखील असते, जे शरीराला लोह शोषून घेण्यास मदत करते. मेथी आणि कोथिंबीर यांचाही आहारात समावेश करा.

ड्राय फ्रूट्स आणि बिया :

खजूर आणि मनुके : रोज सकाळी भिजवलेले २-३ खजूर आणि काळे मनुके खाल्ल्याने रक्तातील हिमोग्लोबिन झपाट्याने वाढते.

भोपळ्याच्या बिया : यामध्ये लोहाचे प्रमाण भरपूर असते, जे स्नॅक्स म्हणून उत्तम पर्याय आहेत.

कडधान्ये : डाळी, चणे, राजमा आणि सोयाबीनमध्ये लोहाचे प्रमाण अधिक असते. शाकाहारी लोकांसाठी लोह मिळवण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे.

फळे : डाळिंब: डाळिंब खाल्ल्याने शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते

पेरू आणि सफरचंद : ही फळे लोहाचे चांगले स्त्रोत आहेत.

बीट : बीटचा रस किंवा कोशिंबीर रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी रामबाण उपाय मानला जातो.

गुळामध्ये नैसर्गिक लोह असते. जेवणानंतर थोडा गूळ खाणे किंवा गूळ-शेंगदाण्याचे लाडू खाणे हा लोहाची कमतरता भरून काढण्याचा पारंपारिक आणि प्रभावी मार्ग आहे.

केवळ लोहयुक्त पदार्थ खाऊन चालत नाही, तर ते शरीरात शोषले जाणेही महत्त्वाचे असते. त्यासाठी आहारात लिंबू, संत्री किंवा आवळा यांसारख्या व्हिटॅमिन सी युक्त पदार्थांचा समावेश करा. यामुळे अन्नातील लोह शरीरात लवकर शोषले जाते.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या जीवाला रुपाली चाकणकरांकडून धोका?

### बीडमधील इसमाची अशोक खरात प्रकरणातील SIT कडे तक्रार

बीड, ता. ११ : राज्यात सध्या भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण चांगलेच गाजत असून यात आता एक अत्यंत खळबळजनक वळण मिळाले आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाकडे म्हणजेच एसआयटीकडे बीडमधील एका व्यक्तीने गंभीर तक्रार केली आहे. या तक्रारीमध्ये राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या जीवाला राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यापासून धोका असल्याचे म्हटले आहे. या एका तक्रारीमुळे राजकीय वर्तुळात आणि पोलीस प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून सर्वत्र याचीच चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील एका व्यक्तीने थेट एसआयटीकडे धाव घेऊन ही धक्कादायक तक्रार नोंदवली आहे. अशोक खरात प्रकरणाशी संबंधित विविध धागेदोरे पोलीस तपासत असतानाच ही नवीन तक्रार समोर आल्याने तपासाची व्याप्ती आणि गुंतागुंत अधिक वाढली आहे. तक्रारदाराने रुपाली चाकणकर यांच्यापासून सुनेत्रा पवार यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो असा खळबळजनक दावा केला आहे.

आता या तक्रारीमध्ये नेमके तथ्य किती आहे की केवळ खोडसाळपणा म्हणून ही तक्रार करण्यात आली आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. राजकीय आकसातून कोणाला बदनाम करण्यासाठी हा प्रकार केला आहे का,



या दिशेनेही आता एसआयटीकडून चौकशी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दुसरीकडे, अशोक खरात याने ज्या महिलांची किंवा लोकांची फसवणूक केली आहे, त्यांच्यासाठी एसआयटीने हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. या हेल्पलाईनवर तक्रारींचा मोठा ओघ सुरू असून दररोज शेकडो लोक संपर्क साधत आहेत. यामध्ये केवळ आर्थिक फसवणूक किंवा लैंगिक शोषणाचे गुन्हे नसून अनेक कौटुंबिक वादाशी संबंधित तक्रारींचाही समावेश असल्याचे समजते. या सर्व तक्रारींची सत्यता पडताळून पाहणे आता पोलिसांसमोर मोठे आव्हान बनले आहे.

इतरांचे भविष्य सांगणाऱ्या या भोंदू अशोक खरातला आता स्वतः चे भविष्य मात्र अंधारात दिसत आहे. पोलीस कोठडीत असताना त्याने इथून बाहेर पडणे कठीण असून आपले मरण इथेच असल्याचे म्हटल्याची माहिती समोर आली आहे.

खरातवर आतापर्यंत एकूण १५ गुन्हे दाखल झाले असून सध्या तिसऱ्या गुन्ह्यात त्याची कसून चौकशी सुरू आहे. त्याने फसवणुकीचे गुन्हे कबूल केल्याचेही सांगण्यात येत आहे. धार्मिक विधीच्या नावाखाली महिलांचे शोषण आणि आर्थिक लूट केल्याचे गंभीर आरोप त्याच्यावर असून पोलीस अधिक पुरावे गोळा करत आहेत. या तपासात अजूनही काही मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.

## खेड तालुक्यात भेसळयुक्त मँगो पल्पवर मोठी कारवाई

राजगुरुनगर, ता. ११ : खेड तालुक्यातील राक्षेवाडी येथे सुरू असलेल्या भेसळयुक्त मँगो पल्पच्या गोरखधंद्यावर अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई करत तब्बल अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या प्रकाराचा पर्दाफाश झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राक्षेवाडी येथील अविष्कार एंटरप्रायझेस या मूळ पुरवठादाराकडून तसेच मावळ तालुक्यातील उरसे येथे महंमद एकरामुल उर्फ अक्रम गुलाम यांच्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. या ठिकाणी मँगो पल्प तयार करण्यासाठी वापरली जाणारी भेसळयुक्त साखर, गाईचे दूध, तसेच केमिकलयुक्त 'केशर कलर' मोठ्या प्रमाणात आढळून आले आहे.

# पुरंदरमध्ये हेलिकॉप्टरचं लँडिंग चुकलं; मंत्री छगन भुजबळ थोडक्यात बचावले

पुरंदर, ता. ११ : महाराष्ट्राचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर शनिवारी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात चुकीच्या ठिकाणी उतरल्याची घटना घडली. नियोजित हेलिपॅडऐवजी हेलिकॉप्टर जवळच्याच पार्किंग परिसरात उतरले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि मंत्री तसेच वैमानिक सुरक्षित आहेत.

ही घटना ते खानवडी गावात एका स्थानिक कार्यक्रमासाठी जात असताना घडली. लँडिंगदरम्यान वैमानिकाला हेलिपॅड दिसेनासे झाले आणि ब्राउनआउट या स्थितीमुळे दृश्यमानता अचानक कमी झाली. हेलिकॉप्टरच्या रोटरमुळे उडालेल्या



धुळीमुळे आणि कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या या परिस्थितीत वैमानिकाला अचूक लँडिंग करणे कठीण झाले. परिणामी, हेलिकॉप्टर नियोजित हेलिपॅडऐवजी शेजारील मोकळ्या वाहन पार्किंगमध्ये उतरले.

या घटनेचा व्हिडिओ समोर आला असून, त्यात हेलिकॉप्टर सुरक्षितपणे खाली उतरताना दिसत आहे. जरी लँडिंग नियोजित ठिकाणी झाले नसले, तरी ते नियंत्रित पद्धतीने पार पडले आणि कोणत्याही व्यक्ती किंवा मालमत्तेला धोका निर्माण झाला नाही.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि वैमानिकाला चुकीच्या लँडिंगबाबत माहिती दिली. त्यानंतर हेलिकॉप्टर योग्य हेलिपॅडकडे हलवण्यात आले. ब्राउनआउट ही हेलिकॉप्टर उड्डाणातील एक सामान्य पण आव्हानात्मक परिस्थिती मानली जाते. विशेषतः कोरड्या आणि धुळीच्या भागात लँडिंग करताना अशी समस्या निर्माण होते आणि त्यामुळे वैमानिकाचा गोंधळ उडू शकतो. दरम्यान, या घटनेबाबत अद्याप कोणतीही चौकशी जाहीर करण्यात आलेली नाही. थोड्याशा व्यत्ययानंतर मंत्री छगन भुजबळ यांनी नियोजित कार्यक्रमात सहभाग घेतला.

## इंदापूर–करमाळा भागातील सराईत वाळूतस्कर जेरबंद

आदित्य बोराटे



इंदापूर, ता. ११ : इंदापूर आणि करमाळा तालुक्याच्या सीमावर्ती भागात अवैध वाळू उत्खनन करून धुमाकूळ घालणाऱ्या एका सराईत वाळूतस्करावर पुणे ग्रामीण पोलिसांनी 'एमपीडीए' कायद्यानुसार (महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा कायदा) कारवाई केली आहे. युवा उर्फ विवेक राजेंद्र फलफले असे या कारवाई करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

विवेक फलफले हा इंदापूर-करमाळा परिसरात संघटितपणे अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक करत होता. त्याच्यावर केवळ वाळू चोरीच नव्हे, तर अत्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत, त्यामध्ये खुनाचा प्रयत्न करणे, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, चोरी आणि अवैध वाळू उत्खननाचे ६ पेक्षा जास्त गंभीर गुन्हे दाखल आहेत.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी जिल्ह्यातील गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांविरुद्ध मोहीम उघडली आहे. फलफले याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण होत असल्याचा प्रस्ताव पोलिसांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला होता. या प्रस्तावाची गांभीर्याने दखल घेत पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आरोपीला स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले.




## महात्मा फुलेंचे विचारच समाज परिवर्तनाची खरी शिदोरी : डॉ. मंजुळकर

लोणी काळभोर, ता. ११ : महात्मा फुलेंनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करून समाजाला अज्ञानाच्या अंधकारातून मुक्त केले. त्यांचे विचार केवळ पुस्तकांपुरते न ठेवता प्रत्यक्ष जीवनात अंगीकारणे, हीच त्यांना खरी आदरांजली आहे. फुलेंचे विचार हीच समाज परिवर्तनाची खरी शिदोरी आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी केले.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात शनिवारी (ता.११) क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची १९९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने महाविद्यालयात विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी बोलताना त्यांनी फुलेंच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर सखोल भाष्य केले. स्त्रियांसाठी पहिली शाळा सुरू करण्यापासून ते सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपर्यंतचा त्यांचा संघर्ष त्यांनी प्रभावीपणे मांडला.

दरम्यान, जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच बेटी पढाव, बेटी बचाव या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी जनजागृती करत समाजाला सकारात्मक संदेश दिला. या श्रमदान उपक्रमात १४ विद्यार्थिनींनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवत परिसर स्वच्छ केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. संभाजी निकम यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. संभाजी निकम व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## एलपीजी सिलेंडरचा पुरवठा सुरळीत; मंत्रालयाने दिला टंचाईच्या अफवांना पूर्णविराम

पुणे, ता. ११ : इराणमधील युद्धविरामानंतर देशात एलपीजी, पीएनजी तसेच पेट्रोल-डिझेलच्या पुरवठ्याबाबत निर्माण झालेल्या चिंतेवर केंद्र सरकारने मोठा खुलासा केला आहे. सरकारकडे इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची टंचाई नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, देशात दररोज सुमारे १ लाख एलपीजी सिलेंडरची विक्री होत असून पुरवठा पूर्णपणे सुरळीत आहे. एलपीजी वितरक आणि पेट्रोल पंपांकडेही पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

घरगुती एलपीजीचा पुरवठा सुरळीत असून सुमारे ९८ टक्के बुकिंग ऑनलाइन होत आहेत.



व्यावसायिक एलपीजी पुरवठाही हळूहळू पूर्वस्थितीत येत आहे. सध्या सुमारे ७० टक्के पुरवठा सुरू झाला आहे. १४ मार्चपासून आतापर्यंत १ लाख ६ हजार टन एलपीजीची विक्री झाली असून दररोज ६ ते ६.५ हजार टन विक्री होत आहे.

५ किलोच्या लहान सिलेंडरबाबतही सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नागरिकांना सोय व्हावी म्हणून ओळखपत्राशिवायही या सिलेंडरचा पुरवठा वाढवण्यात आला आहे. दररोज सुमारे १ लाख ५ किलो सिलेंडर विकले जात असून २३ मार्चपासून आतापर्यंत ११ लाख सिलेंडरची विक्री झाली आहे.

याशिवाय, एलपीजीऐवजी पीएनजी वापर वाढवण्यावर सरकार भर देत आहे. देशभरात २४०० हून अधिक जनजागृती शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. नैसर्गिक वायू पुरवठाही सुधारत असून उद्योग क्षेत्राला सुमारे ८० टक्के आणि खत उद्योगाला ९५ टक्के पुरवठा पुन्हा सुरू झाल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, इराणमधील युद्धविरामाचा सकारात्मक परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर झाला असून त्याचा फायदा भारतालाही होत आहे. त्यामुळे देशातील इंधन पुरवठा स्थिर राहिल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## UPI पेमेंटसाठी आता १ तास वाट पाहावी लागणार?

### १० हजारांवरील व्यवहारांसाठी RBI चा नवा नियम

पुणे, ता. ११ : आजकाल डिजिटल पेमेंटमुळे व्यवहार खूप सोपे झाले आहेत. पण याच सोयीचा फायदा घेत सायबर गुन्हेगारीही वाढली आहे. एक चुकीचा कॉल किंवा लिंक तुमचं बँक खातं रिकामं करू शकते. या पार्श्वभूमीवर RBI ने ऑनलाइन फसवणूक रोखण्यासाठी काही महत्त्वाचे बदल सुचवले आहेत.

RBIने सुचवलेल्या प्रस्तावांमध्ये सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे १०,००० रुपयांपेक्षा जास्त व्यवहारांवर १ तासाचा वेटिंग पीरियड ठेवण्याचा नियम. म्हणजे तुम्ही मोठी रक्कम ट्रान्सफर केल्यावर ती लगेच जमा न होता १ तासानंतर जमा होईल. या वेळेत फसवणूक लक्षात आल्यास व्यवहार थांबवण्याची संधी मिळणार आहे. कारण देशातील सुमारे ९८.५ टक्के डिजिटल फसवणुकीची प्रकरणे १०,००० रुपयांपेक्षा जास्त व्यवहारांशी संबंधित असल्याचे सांगितले जाते.

याशिवाय किल स्विच ही नवीन सुविधा देखील आणली जाणार आहे. मोबाईल हरवला किंवा खाते हॅक झाल्याचा संशय आला तर ग्राहक एका क्लिकवर सर्व डिजिटल व्यवहार बंद करू शकतील. जोपर्यंत बँकेत जाऊन पडताळणी होत नाही, तोपर्यंत कोणताही ऑनलाइन व्यवहार करता येणार नाही. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठीही विशेष सुरक्षा उपाय सुचवण्यात आले आहेत. ५०,००० रुपयांपेक्षा जास्त व्यवहारांसाठी अतिरिक्त पडताळणी आवश्यक असेल. यामुळे फोन कॉलद्वारे होणारी फसवणूक कमी होण्यास मदत होईल. फसवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या म्युल अकाउंट्सवरही निर्बंध घालण्यात येणार आहेत. अपूर्ण माहिती असलेल्या खात्यांवर वर्षाला २५ लाख रुपयांची मर्यादा असेल. त्यापेक्षा जास्त व्यवहारासाठी अतिरिक्त पुरावे द्यावे लागतील. गेल्या काही वर्षांत डिजिटल व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली असली तरी सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही झपाट्याने वाढले आहे. २०२१ मध्ये २.६ लाख असलेली प्रकरणे २०२५ पर्यंत २८ लाखांपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. फसवणुकीतून लुटली गेलेली रक्कमही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. हे सर्व नियम लागू करण्यापूर्वी ८ मेपर्यंत नागरिकांना आपले अभिप्राय देण्याची संधी देण्यात आली आहे.

## समता पतसंस्था गैरव्यवहार प्रकरण; रुपाली चाकणकर यांच्या बहिणीला पोलिसांची नोटीस

शिर्डी, ता. ११ : शिर्डी पोलिसांनी समता पतसंस्थेतील संशयित खात्यांच्या चौकशीसाठी महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या बहिणी व जाऊ प्रतिभा चाकणकर यांना नोटीस बजावली आहे. त्यांना ५ दिवसांत शिर्डीत हजर राहून जबाब नोंदवण्यास सांगण्यात आले आहे.

भोंदू अशोक खरात विरोधात शिर्डीत सावकारीचा गुन्हा दाखल असून त्याच्या तपासादरम्यान राहाता येथील समता पतसंस्थेच्या शाखेत अनेक संशयित खाती आढळली आहेत. या खात्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचे व्यवहार झाल्याचे समोर आले आहे. संबंधित खात्यांमध्ये खरात वारसदार असल्याची नोंद असल्याने पोलिसांकडून खातेदारांची चौकशी सुरू आहे. आतापर्यंत ३३ जणांचे जबाब नोंदवण्यात आले असून त्यामध्ये आता प्रतिभा चाकणकर यांना चौकशीसाठी बोलावण्यात



आले आहे. दरम्यान, अशोक खरात आणि त्याच्या २ सहकाऱ्यांविरुद्ध श्रीरामपूर पोलीस ठाण्यात पत्रकाराला धमकावल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्रकार दत्तात्रय खेमनर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, खरातने त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केला तसेच वारंवार धमक्या दिल्याचा आरोप आहे.

या प्रकरणाशी संबंधित कारवाईत अंमलबजावणी संचालनालयाने अशोक खरातची ३ बँक खाती आणि त्याची पत्नी कल्पना खरात हिचे १ खाते सील केले आहे. या खात्यांमधील मागील ३ वर्षांतील व्यवहारांची तपासणी करण्यात आली आहे. याचदरम्यान, पुणे जिल्ह्यातील बारामती येथे अघोरी पूजा करून फसवणूक केल्याच्या प्रकरणात एका भोंदू व्यक्तीला न्यायालयाने ४ वर्षे सक्तमजुरी आणि १५००० दंडाची शिक्षा सुनावली आहे.

# यवतमध्ये फॉर्च्युनरची तोडफोड करत कुटुंबाला दिली कोयत्याने जीवे मारण्याची धमकी

### तिघांवर यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

यवत, ता. ११ : मागील काही दिवसांपूर्वी आपल्या भावावर आणि पत्नीवर झालेल्या पोलीस कारवाईचा राग मनात धरून सराईत गुंडाने आपल्या साथीदारांसह फॉर्च्युनर गाडीच्या काचा फोडून कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. बुधवारी (ता. ०८) रात्री पाऊणे बारा वाजण्याच्या सुमारास यवत हद्दीतील मलभारे वस्ती येथे हि घटना घडली. याप्रकरणी तिघांवर यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी सदाशिव जानकुराम मलभारे (वय-५३, रा. मलभारे वस्ती, यवत, ता. दौंड) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी शुभम बाळू



लकडे (रा. मानकोबावाडा, यवत, ता. दौंड) अनोळखी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सदाशिव मलभारे यांचा मुलगा विक्रम मलभारे हा कुटुंबासह लोणी काळभोर येथील नातेवाईकांकडे जेवणासाठी गेला होता. बुधवारी (ता. ०८) रात्री १० वाजता सर्वजण घरी परतले आणि त्यांनी त्यांची फॉर्च्युनर गाडी घरासमोर उभी केली होती.

रात्री पाऊणे बारा वाजण्याच्या सुमारास घराबाहेर आरडाओरडा ऐकू आल्याने मलभारे पिता-पुत्र बाहेर आले. तेव्हा तिथे शुभम लकडे हा आपल्या दोन साथीदारांसह उभा होता. शुभम आणि त्याच्या एका साथीदाराच्या हातात लोखंडी कोयते होते. त्यांनी आरडाओरडा करत मलभारे यांच्या फॉर्च्युनर गाडीच्या काचा फोडण्यास सुरुवात केली. जेव्हा सदाशिव मलभारे आणि त्यांचा मुलगा मदतीसाठी ओरडले, तेव्हा शुभम लकडे हा कोयता घेऊन त्यांच्या अंगावर धावून आला. जीवाच्या भीतीने मलभारे कुटुंबीयांनी घरात पळून जाऊन दरवाजा बंद करून घेतला. यावेळी आरोपी शुभम लकडे याने घराच्या ओट्यावर कोयता जोरजोरात मारून परिसरात दहशत निर्माण केली. माझ्या भावावर आणि पत्नीवर गुन्हा दाखल केल्याचा बदला घेईन, आमच्या नादी लागला तर जीवे ठार मारून टाकीन, अशी धमकी त्याने भरवस्तीत दिली. त्यानंतर तो आपल्या साथीदारांसह दुचाकीवरून पसार झाला.

घटनेनंतर मलभारे यांनी तातडीने 'डायल ११२' वर फोन करून पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे. सुरुवातीला दहशतीमुळे हे कुटुंब तक्रार देण्यास पुढे आले नव्हते, मात्र धाडस करून त्यांनी १० एप्रिल रोजी यवत पोलीस ठाण्यात धाव घेतली. सदाशिव मलभारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शुभम बाळू लकडे आणि त्याच्या इतर साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मेतलवाड करीत आहे.